# UGC Sponsored Major Research Project
# Huzur Hukums of Maharaja Syajirao III: Literary, Cultural and Sociological Study

## EXECUTIVE SUMMARY


Principal Investigator

**Prof. Sanjaykumar Karandikar**

Head, Department of Marathi

Faculty of Arts

The Maharaja Sayajirao University of Baroda

Vadodara- 390011

# महाराजा सयाजीराव (तिसरे) यांचे हुजूर हुकुमः साहित्यिक, सांस्कृतिक आणि सामाजिक अभ्यास

## Huzur Hukums of Maharaja Sayajirao III: Literary, Cultural and Sociological Study

बडोद्याचे महाराजा श्रीमंत सयाजीराव गायकवाड (तिसरे) यांचा राज्यकारभार (१८८१ ते १९३९)अनेक दृष्टींनी महत्त्वपूर्ण आहे. रयतेचं कल्याण आणि राज्याच्या सुख–समृद्धीचे संवर्धन हाच एकमेव संकल्प त्यांनी आयुष्यभर जपला, राबवला. त्यांच्या विविध उपक्रमांमध्ये सुशासन, देशप्रेम, साहित्य, संस्कृती, धर्म, इतिहास, शिक्षण, स्वदेशी चळवळीला पाठिंबा इत्यादी बाबी महत्त्वपूर्ण आहेत. महाराजांच्या याच संकल्पाचा, धोरणाचा परिणाम म्हणून आपल्या शासनाच्या पहिल्या दोन दशकातच त्यांनी समाजजीवनाच्या कल्याणाची इतकी कामे केली की ज्यामुळे अखिल भारताचे लक्ष त्यांच्याकडे वळले आणि प्रजा एक 'पुरोगामी' आणि 'प्रजावत्सल' राजा म्हणून त्यांच्याकडे पाहू लागली. त्यांच्या उत्तम आणि कुशल शासनव्यवस्थेमुळे राजा आणि प्रजा हे संबंध परिवर्तित होऊन त्यांची परिणती पिता–पुत्र संबंधांमध्ये झाली.

इ. स. १८८०मध्ये बरोडा कॉलेज या संस्थेची स्थापना झाली. या संस्थेचे पहिले प्राचार्य होते महर्षी अरविंद. या कॉलेजची स्थापना सयाजीराव महाराजांच्या कारकिर्दीला सुरुवात होण्याच्या एकच वर्ष अगोदर झाली होती. पण, या संस्थेच्या विकासाच्या बाबतीत मात्र महाराज अतिशय दक्ष होते. महाविद्यालयात उत्तमोत्तम अध्यापक असावेत आणि महाविद्यालयात प्रगत विषयांचे अध्यापन व्हावे यासाठी महाराज जातीने लक्ष पुरवीत असत. कालांतराने इथे एक आंतरराष्ट्रीय कीर्तीचे विद्यापीठ असावे हे स्वप्न त्यांनी पाहिले आणि त्या दिशेने कामाला सुरुवात केली. त्यांनी पाहिलेले हे स्वप्न त्यांच्या मुलाने म्हणजेच प्रतापसिंहराव गायकवाडांनी पूर्ण केले, हा योगायोगच म्हणावा लागेल.

इ.स. १८९२ साली त्यांनी बडोदे येथे कला भवन या संस्थेची स्थापना केली. आणि विशेष म्हणजे या संस्थेत अध्यापनाचे माध्यम होते गुजराती. लार्ड मेकाले भारतीय भाषांच्या संदर्भात म्हणत असे की भारतीय भाषा क्षमताविहीन असून त्यात दर्जेदार साहित्यनिर्मिती तर जाऊच द्या पण, चांगल्या दर्जाच्या अनुवादाची देखील क्षमता नाही. खरे तर ह्यातून त्यांनी लार्ड मेकालेला त्याने चालवलेल्या अपप्रचाराला एक सणसणीत उत्तर दिले होते.

त्यांच्या कारकिर्दीत 'ग्रंथालय चळवळ' हे एक मोठे कार्य म्हणता येईल असे होते. ज्ञानाचे महत्त्व हे सयाजीराव महाराजांना पटले होते आणि म्हणूनच त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत अनेक ग्रंथालयांची स्थापना केली. ग्रंथकार, ग्रंथनिर्मिती, ग्रंथालये आणि ग्रंथप्रसार या संबंधाने महाराजांनी उपयोजिलेले विविध अभिनव उपक्रम लोकविश्रुतच आहेत. महाराजांनी अनेक साहित्यिकांना पुरस्कार दिले, अनुदाने दिली, ग्रंथनिर्मितीसाठी राखीव निधी उभारून विविध ग्रंथमालांच्या योजना सुरू केल्या. त्यातील सयाजी ग्रंथमाला म्हणजे 'एकमेवा द्वितीयो: अशाच स्वरूपाची आहे. जवळ-जवळ प्रत्येक गावात एक शाळा आणि एक ग्रंथालय यांची स्थापना त्यांनी केली. फार काय त्यांनी चलित ग्रंथालयाचा अभिनव उपक्रम हाती घेतला आणि त्याद्वारे सर्वसामान्य माणसापर्यंत उत्तमोत्तम ग्रंथ पोचते केले. त्यांच्याच कारकिर्दीत जगातील उत्तमोत्तम ग्रंथांच्या भाषांतरासाठी आणि ग्रंथनिर्मितीसाठी एक स्वतंत्र शासकीय खाते सुरू करण्यात आले होते.

त्यांचा भाषाविषयक विचारही अतिशय महत्त्वाचा होता. १९०९साली बडोद्यात भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून बोलताना ते म्हणाले होते-"भाषा ही समाजाच्या प्रगतीची व विचारांची तसबीर आहे. भाषेवरून राष्ट्राची स्थिती ताडता येते.....भाषेचा विचार आपण प्रांतिकदृष्ट्या करू नका. राष्ट्रीयदृष्ट्या करा. सर्व राष्ट्राचा उद्धार देशी भाषांच्याद्वारे झाला पाहिजे."

सयाजीराव महाराज हे एक विचारसंपन्न व्यक्तिमत्त्व होते. आपल्या राज्याच्या प्रत्येक अंगाबाबत त्यांचा स्वत:चा असा काही विचार होता, हे त्यांच्या उक्ती-कृती पाहता सहज ध्यानात येते. आपली प्रजा अभिरुचिसंपन्न असावी या दृष्टीने त्यांनी कला व साहित्य यासंबंधाने निश्चितच काही विधायक विचार केला होता, हे त्यांनी ज्या पद्धतीने आपल्या राज्यात कला व साहित्य यांचे संवर्धन केले, त्यावरून कळते. सयाजीराव महाराजांकडे स्वत:चा असा संस्कृतीविचार होता; पुन्हा हा त्यांचा विचार केवळ पुस्तकी स्वरूपाचा नव्हता तर त्यांनी त्यांच्या विचाराला प्रत्यक्ष कृतीची जोड दिलेली होती. त्यांची दृष्टी अत्यंत व्यापक होती म्हणूनच त्यांनी मराठीबरोबरच गुजराती वाङ्मयीन संस्कृतीच्या विकासाकडेही लक्ष पुरविले.

साहित्य-संस्कृतीसोबतच महाराजांनी त्यांच्या कारकिर्दीत प्रशासकीय, सामाजिक आणि राजकीय विषयांकडे देखील लक्ष पुरविले. ग्रामपंचायतींचे पुनरुज्जीवन करून अधिकारांचे विकेन्द्रीकरण ही चळवळ महाराजांनी राबविली. इ.स. १९०८साली 'धारासभा'ची स्थापना करून त्यात समाजातील सर्वच थरातील, वर्गातील आणि जातीतील लोकांना समाविष्ट करून घेतले. एवढेच नाही तर, विधवांची स्थिती सुधारावी यासाठीचे तसेच बाल-

विवाहविरोधी कायदे त्यांनी अमलात आणले. जातिप्रथा, शिवाशिव आणि उच्च–नीचतेची भावना मुळातून उपटून टाकण्यासाठी महाराजांनी अतोनात प्रयत्न केले.

जीवनाच्या विविध अंगांकडे पाहण्याची विलक्षण दृष्टी महाराजा सयाजीराव यांच्याकडे होती. राज्याचे सामाजिक आरोग्य कसे जपायला पाहिजे याचे भान त्यांच्याकडे होते. खऱ्या अर्थाने प्रजापालक, प्रजारक्षकाची भूमिका महाराजांनी तहहयात बजावली. साहित्यव्यवहाराकडे बघण्याची त्यांची दृष्टी विशिष्ट स्वरूपाची होती. त्यांच्या मते ग्रंथनिर्मिती ही केवळ वाङ्मयीन चळवळ नाही; ती सामाजिक अभिवृद्धींची महान चळवळ आहे. म्हणून केवळ इतिहास व वाङ्मय यांवरील ग्रंथनिर्मितीस प्रोत्साहन देऊन न थांबता विविध विषयावरील (अगदी धातुविज्ञान, वास्तुविज्ञान, व्यायाम व शरीररचना इ.) ग्रंथनिर्मिती महाराजांनी करवून घेतली.

महाराजांनी आपल्या कारकिर्दीत सुरवातीपासून शेवटपर्यंत वेळोवेळी केलेल्या हुजूर हुकुमांची संख्या जवळ–जवळ ७५,००० इतकी आहे. या हुकुमांपैकी काही हुकूम संक्षिप्त तर इतर हुकूम एखाद्या निबंधाप्रमाणे सविस्तर आणि विवेचनात्मक आहेत. हे हुकूम म्हणजे खरे तर महाराजांचे राजकारण, समाजकारण आणि संस्कृतिविषयक अंतरंग व्यक्त करणारे आहेत. त्यामुळे या हुकुमांचा संग्रह म्हणजे महाराजांचे एक आगळे–वेगळे आत्मवृत्तच ठरावे असे आहे. हे हुकूम त्यांच्या जवळ–जवळ पाच तपांच्या कारकिर्दीत केलेले आहेत. त्यातील प्रत्येक हुकूम हा तत्कालीन सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक परिस्थितीला अनुसरून केलेला आहे. या हुकुमांतील विचारांची प्रगल्भता, मांडणीची स्पष्टता व भाषेची समृद्धता महनीय असल्यामुळे त्यांना मराठी वाङ्मयात महत्त्वाचे स्थान मिळेल यात शंका नाही. असे असूनही, हे वाङ्मय सर्वसाधारण प्रजेला उपलब्ध नाही.

या हुजूर हुकुमांचे स्थूल मानाने खालील प्रमाणे वर्गीकरण करता येते:

१. राज्यकारभार
२. आर्थिक व्यवस्था
३. न्यायपद्धती
४. शिक्षण
५. संस्कृतिविषयक
६. सामाजिक

या सर्व प्रकारच्या हुकुमांतून महाराजांच्या विचारांचा ओघ समर्पक रीतीने प्रतीत होतो. कोणत्याही विकसित देशातील राज्यपद्धतीला शोभेल अशीच व्यवस्था या हुकुमांतील त्यांच्या विचारांतून व्यक्त होते.

साहित्य हे जीवनाच्या सर्व व्यवहाराला व्यापणारे असते मग तो राजकीय व्यवहार असो सांस्कृतिक व्यवहार असो की सामाजिक व्यवहार. या हुकुमांच्या पद्धतशीर अभ्यासातून तत्कालीन साहित्यिक, सांस्कृतिक आणि सामाजिक निष्कर्ष तर हाती येतीलच शिवाय इतक्या महत्तवाचे ऐतिहासिक दस्तऐवज अभ्यासकांना, वाचकांना उपलब्ध होतील.

प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात या हुजूर हुकुमांची नोंदणी आणि वर्गवारी करण्यात आलेली असून त्या हुकुमांचा पद्धतशीर अभ्यास करण्यात आला आहे. या शिवाय यातील काही अतिमहत्त्वाच्या हुकुमांचे डिजिटलायजेशन करणे हा देखील एक महत्त्वाचा हेतू आहे. वास्तविक पाहता हुजूर हुकुमांची संख्या लक्षात घेता प्रकल्पाचा आवाका विस्तीर्ण असून फक्त तीनच वर्षांत हे काम पूर्ण करणे अवघड होते/आहे. असे असले तरीही या हुजूर हुकुमांच्या आधारे बडोदे संस्थानात झालेल्या साहित्यिक सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमांचा आलेख मांडण्याचा हा एक विधायक प्रयत्न असेल.

प्रकरण पहिले: सदर प्रकरणात बडोदे संस्थानाचा परिचय, गायकवाड घराण्यातील विविध राजे, त्यांचा राज्यकारभार, सामाजिक सांस्कृतिक परिस्थितीचा आढावा घेण्यात आलेला आहे.

प्रकरण दुसरे: प्रबंधाच्या दुसऱ्या प्रकरणात महाराजा सयाजीरावांचा जीवन परिचय, त्यांची जडण घडण, त्यांच्या राज्यकारभारातील महत्वाच्या घटना इत्यादींचा सविस्तर परिचय करून देण्यात आला आहे.

प्रकरण तिसरे: सदर प्रकरणात महाराजांनी वेळोवेळी सोडलेले हुकुम त्यांची उपलब्धता, आणि त्यांचे विषयवार वर्गीकरण करण्यात आले आहे.

प्रकरण चौथे: प्रकल्पाच्या चौथ्या प्रकरणात त्यांच्या हुकुमांचा साहित्यिक, सांस्कृतिक आणि समाजशास्त्रीय दृष्टिकोणातून विचार केला आहे.

प्रकरण पाचवे: प्रकल्पाच्या पाचव्या प्रकरणात अभ्यासलेल्या हुकुमांतून दिसून येणारे महाराजांच्या स्वभाव वैशिष्ट्य अभ्यासण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रकरणा सहावे: उपसंहार

डॉ. संजयकुमार करंदीकर
प्राध्यापक व प्रमुख
मराठी विभाग

कला–संकाय
महाराजा सयाजीराव युनिवर्सिटी ऑफ बरोडा